# एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीसांबद्दलच्या व्यावसायीक सामाजिक जबाबदाऱ्यांचा अभ्यास

**प्रा. मोरेश्वर भिकाजी शेन्डे**
सहायक प्राध्यापक व वाणिज्य विभागप्रमुख
नूतन आदर्श कला वाणिज्य आणि
श्रीमती म.ह. वेगड विज्ञान महाविद्यालय, उमरेड जि. नागपूर
आणि पीएच डी संशोधक विद्यार्थी
संताजी महाविद्यालय, नागपूर

***सारांशः—***
*भारतातील कुपोषण दूर करण्यासाठी दुर्बल, गरीब, निराधार वर्गातील लोकांच्या पोषण व आहाराची काळजी घेण्यासाठी एकात्मिक बालविकास सेवा योजना सुरू करण्यात येवून योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे कार्य अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीसांवर सोपविण्यात आले. त्यांच्याव्दारे बालविकासातून मजबूत समाजनिर्मितीचे कार्य कठीण परिस्थीतीत केले जाते. मात्र कार्यस्थळाच्या तसेच आर्थिक — सामाजीक अशा विविध समस्यांमुळे त्या त्रस्त असून त्यांच्याविशयाच्या सामाजीक जबाबदाऱ्यांकडे सरकारने लक्ष देउन त्या पूर्ण करण्यावरच या महत्वाकांक्षी योजनेचे यश अवलंबून आहे. प्रस्तुत भाोधनिबंधात अंगणवाडी सेविका व मदतनीसांचे कार्य, त्यांच्या कार्यामुळे समाजाला मिळणारे लाभ, कार्याबद्दल त्यांना मिळणारा मोबदला व सोयी सुविधा तसेच त्यांच्याप्रति सरकारच्या सामाजीक जबाबदाऱ्यांचा अभ्यास करून निष्कर्ष सादर केले आहेत.*

***मुख्य शब्दः—***
*एकात्मिक बालविकास सेवा योजना, अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आयसीडीएस, व्यावसायीक सामाजिक जबाबदाऱ्या*

**प्रस्तावणाः—**

कुपोषण ही एक जटिल समस्या आहे. कुपोषण मुलांच्या शारीरिक आणि मानसिक विकासात अडथळा आणते. बालपणातील कुपोषणामुळे संपूर्ण आयुष्य अशक्त होते. कारण यामुळे संपूर्ण जीवनाची वाढ आणि प्रगती प्रभावित होते. कुपोषणाचे मुलांच्या शारीरिक वाढीवर, बौद्धिक विकासावर तसेच आरोग्यावर परिणाम होतात. तसेच मृत्यूचा धोकाही कायम राहतो. कुपोषित मुले सामान्य पोषित मुलांपेक्षा डायरिया, न्यूमोनिया इत्यादी सामान्य आजारांमुळे मरण्याची शक्यता जवळपास 9 पट जास्त असते. म्हणूनच बालपणात मुलांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. आयुष्याच्या पहिल्या 5 वर्षांसाठी पोषणाला विशेष महत्त्व देणे गरजेचे आहे. आयुष्याच्या पहिल्या 1000 दिवसात मिळालेल्या आहाराचा परिणाम मुलाच्या एकूण वाढ आणि विकासावर होतो. एकात्मिक बालविकास सेवा योजना ही भारत सकारची पथदर्शी योजना असून या योजनेची सुरूवात 2 ऑक्टोबर 1975 ला करण्यात आली. बालसंगोपन आणि बालविकासावर ही योजना आधारित आहे. बालक आणि स्तनदा मातांसाठी पुरक पोषण आहाराची तरतूद करण्यासाठीच ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेची उद्दीश्टचे पुढीलप्रमाणे आहेत.

1. 0 ते 6 वर्ष वयोगटातील बालकांचा पोषण व आहाराचा दर्जा सुधारणे.
2. बालकांमध्ये मानसिक, शारिरीक व सामाजिक विकासाचा पाया रचने.
3. मृत्यू, विकृती, कुपोषण आणि शाळेतून होणाऱ्या गळतीचे प्रमाण कमी करणे.
4. बालविकासाला प्रोत्साहन मिळावे यासाठी विविध विभागातील योजना व अंमलबजावणीचा प्रभावी समन्वय साधणे.
5. बालकांचे आरोग्य आणि पोषणाच्या गरजा जपण्यासाठी मातांना अधिक सक्षम बनविणे.

**अंगणवाडी सेविका व मदतनीस**

अंगणवाडी सेविका व मदतनीस या महिला कर्मचारी आयसीडीस योजनेच्या मुख्य आधारस्तंभ आहेत. त्या तळागाळात जाऊन अंगणवाडीचे कार्य करतात. त्यांना अंगणवाडीचे प्रत्येक काम सांभाळावे लागते. रविवार व सणासुदीचे दिवस वगळता दररोज अंगणवाडी केंद्र सुरु असते. अंगणवाडीची वेळ सहसा सकाळी 8 ते दुपारी 2 वाजेपर्यंत असते. अंगणवाडी परिसरात राहणाऱ्या सर्व कुटुंबांचे घरोघरी जावून सर्वेक्षण करणे. सहा वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांचे शिक्षण आणि काळजी घेणे. मुलांच्या सर्वांगीण विकासावर विशेष लक्ष देणे. सहा वर्षांखालील मुलांना, गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या महिलांना पूरक पोशण आहार पुरवणे. आरोग्य तपासणी करणे, लाभार्थ्यांना संदर्भ सेवा प्रदान करणे, प्रदान केलेल्या सेवांचे रेकॉर्ड ठेवणे. प्रलंबित घडामोडी आणि संदर्भांसाठी वेळेवर स्क्रीनिंग, अंगणवाडी केंद्राचे काम पूर्ण झाल्यानंतर गर्भवती महिला आणि किशोरवयीन मुलींच्या घरी भेटी देणे. मुले, महिला आणि पौगंडावस्थेतील मुलींचे पोषण आणि आरोग्याविषयी जागरूकता पसरवणे, ग्राम आरोग्य आणि पोषण दिनाचे रेकॉर्ड ठेवणे इ. कार्य त्यांना करावे लागते. अंगणवाडी मदतनीस महिलेला अंगणवाडी सेविकांना प्रत्येक कामात मदत करावी लागते. त्यांचे मुख्य काम म्हणजे अ) दररोज मुलांना अंगणवाडी केंद्रात आणणे आणि त्यांना घरी सोडणे, ब) केंद्राची स्वच्छता करणे, पाणी आणणे, क) अन्न तयार करणे, भांडी स्वच्छ करणे, ड). मुलांना

शौचास नेणे, तसेच अंगणवाडी सेविकेच्या अनुपस्थितीत अंगणवाडी केंद्राची सर्व जबाबदारी पार पाडणे.

**संशोधनाची उदिदष्ट्येः—**

1. व्यावसायिक सामाजिक जबाबदारीचा अभ्यास करणे.
2. एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व मदनिसांना मिळणाऱ्या मोबदल्याचा अभ्यास करणे.
3. एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व मदनिसांना मिळणाऱ्या सोयी व सवलतींचा अभ्यास करणे.
4. एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व मदनिसांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी उपाय सुचविणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये**

1. एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व मदनिसांना अत्यल्प मोबदला मिळतो.
2. एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व मदनिसांना दुय्यम वागणूक दिली जाते.
3. नियोक्ता म्हणून अंगणवाडी सेविका व मदनिसांबद्दलच्या सामाजीक जबाबदाऱ्यांकडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे.

**व्यावसायीक सामाजिक जबाबदारी**

व्यावसायीक सामाजिक जबाबदारी म्हणजे व्यावसायिकातर्फे समाजाच्या कल्याणाकरिता करण्यात येणारे प्रामाणिक प्रयत्न होत. व्यवसायाची ही जबाबदारी आहे की, त्यांनी व्यवसायात समाविष्ट आणि व्यवसायाशी संबंधित प्रत्येक घटकाच्या फायद्याच्या दृष्टीने आपली धोरणे तयार करावीत.

**व्याख्या**

**कुण्टज् व ओ'डोनेल यांनी दिलेली व्याख्या**

"व्यवसायाची सामाजिक जबाबदारी म्हणजे व्यवसायात गुंतलेल्या प्रत्येक व्यक्तीने, स्वतःच्या व्यक्तिगत हितसंबंधाची जोपासना करीत असतानाच इतरांचे अधिकार व कायदेशीर हितसंबंध यांना नुकसान पोहोचणार नाही या दृष्टीने व्यवहार करण्याचे स्वीकारलेले दायित्व होय.''

**सरकारच्या अंगणवाडी सविका व मदतनीस या महिला कर्मचाऱ्यांसंबंधी जबाबदाऱ्या**

भारतात 13.50 लाख अंगणवाड्यामध्ये सुमारे 27 लाखांपेक्षा जास्त अंगणवाडी सेविका व मदतनीस या महिला कर्मचारी कार्यरत असून त्यांच्या हितसंबंधांची जोपासना करणे, त्यांच्या कल्याणासाठी प्रयत्न करणे, त्यांच्या फायद्याच्या दृष्टीने आपली धोरणे तयार करणे हे नियोक्ता म्हणून सरकारचे काम आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस या महिला कर्मचारी आयसीडीएस प्रकल्पाचा कणा आहेत. त्यांच्या कार्यावरच या प्रकल्पाचे यश अवलंबून आहे. या प्रकल्पातील धोरणांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी यांच्यावरच असते. प्रकल्पासाठी यांचे सहकार्य आवश्यक असते. म्हणून या महिला कर्मचाऱ्यांना योग्य पारिश्रमिक देणे, त्यांची कार्यक्षमता वाढविणे. त्यांना शिक्षण व प्रशिक्षण देणे, त्यांच्यातील अज्ञान दूर करणे, त्यांना सुखी ठेवणे, त्यांच्या सामाजिक कल्याणासाठी प्रयत्न करणे, त्यांना विविध सोयी—सवलती उपलब्ध करून देणे इत्यादीची जबाबदारी नियोक्ता म्हणून सरकारची आहे. सरकारने अंगणवाडी सेविका व मदतनीस या महिला कर्मचाऱ्यांसंबंधी पुढील जबाबदाऱ्या पूर्ण कराव्यात

1. अंगणवाडी सेविका व मदतनीस या महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाचा योग्य व न्याय मोबदला दिला पाहिजे.
2. अंगणवाडी सेविका व मदतनीस या महिला कर्मचाऱ्यांना वेतनाशिवाय आवश्यक सोयी — सवलती उपलब्ध करून द्याव्यात.
3. त्यांना मानवी दृष्टिकोनातून योग्य व चांगली वागणूक द्यावी.
4. त्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती उपाययोजना करावी.
5. त्यांच्यासाठी विविध कामगार कल्याण योजना तयार करून त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी.

**अंगणवाडी सेविका व मदनीसांमुळे होणारे लाभः—**

आयसीडीएस हा कुपोषण निर्मूलनासाठी आखलेला भारत सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून या प्रकल्पाचा उद्देश नफा कमविणे हा नसून समाजातील वंचीत, दुर्बल, गरिब व निराधार व्यक्तींच्या पोषण व आरोग्याची काळजी घेणे हा आहे. आयसीडीएस या कार्यक्रमाची खरी अंमलबजावणी करण्याचे कार्य अंगणवाडी सेविका व मदतनीस करीत असतात. त्यांच्या कार्यामुळे लाभार्थी, समाज, गाव देशाला अनेक लाभ प्राप्त होतात. 0 ते 6 वर्ष वयापर्यंतची मुले, गर्भवती व स्तनदा माता, किशोरवयीन मुली या योजनेच्या लाभार्थी आहेत. अंगणवाडी सेविका व मदतनीसांमुळे लाभार्थ्यांचे पोशण होते. 3 ते 6 वर्श वयापर्यंतच्या मुलांना पूर्वप्राथमिक शिक्षण मिळते. त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते. मुले आपल्या देशाचे भविष्य आहेत. देशाच्या भविष्याची आधारशिला आहेत. त्यांना निरोगी आणि तंदुरुस्त ठेवण्यात अंगणवाडी सेविका व मदतनीसांची महत्वाची भूमिका असते. त्यांच्या कार्यामूळेच मजबूत आणि समृद्ध समाजाची निर्मिती होते.

अंगणवाडी सेविका व मदतनीस महिला या गावातील आयसीडीएस प्रकल्पातील महत्वाच्या कार्यकर्त्या आहेत. त्या समाजातील सर्वात वंचित, प्रभावित आणि गरजूंना मदत करतात. त्यांचा हा प्रयत्न अमूल्य आहे आणि निरोगी व समृद्ध समाज निर्माण करण्यासाठी उपयुक्त आहे. एक डॉक्टर आजारी लोकांना बरे करतो, पण या महिला कार्यकर्त्या लोक आजारी पडू नयेत म्हणून प्रयत्न करतात. म्हणूनच त्यांचे काम खूप आव्हानात्मक आणि महत्वाचे आहे. अंगणवाडी कार्यकर्त्या म्हणून त्यांचे गाव आणि समाजाशी विशेष नाते असते. त्या गावातील महिला, किशोरवयीन मुली, लहान मुले आणि कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधतात. त्या अंगणवाडीच्या

माध्यमातून सेवा देतात. अंगणवाडी सेविका व मदतनिस विशेष प्रयत्न करतात. त्याचे काही चांगले परिणाम येतात. त्यांना दररोज गावातील महिला, मुले, किशोरवयीन मुली, गावातील इतर लोक आणि अधिकारी अशा अनेक लोकांशी संवाद साधवा लागतो. त्यांना लोकांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकावे लागते. त्यांचे जनतेशी नातेसंबंध अधिक मजबूत होत असते. त्यांना त्यांच्या वैयक्तिक आणि समाजातील समस्यांना अनेक वेळा सामोरे जावे लागते. लाभार्थ्यांचे समुपदेशन करावे लागते. त्या लोकांना सकारात्मक वर्तन करण्याचा सल्ला देतात. त्यांना लाभार्थी आणि त्यांच्या समस्या जाणून घ्याव्या लागतात. लाभार्थ्यांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी विविध पर्याय आणि संबंधित सेवांबद्दल योग्य माहिती सांगावी लागते.अंगणवाडी आपली, समाजाची आणि संपूर्ण गावाची आहे या भावनेतून त्यांना कार्य करावे लागते. लोकांना न रागावता आणि चिडचिड न करता प्रत्येकाचे विचार ऐकूण आणि समजून घ्यावे लागतात. कोणताही भेदभाव न करता सर्वांसाठी कार्य करावे लागते. पालकांचे समुपदेशन करून त्यांच्या वर्तनात बदल घडवून आणण्याचे कार्य त्यांना करावे लागते जेणेकरून मुलांचे आरोग्य आणि पोषण पातळी सुधारू शकेल.

**अंगणवाडी सेविका व मदनीसांना मिळणारा मोबदला व सोयी – सुविधा**

राष्ट्रनिर्मितीचे कार्य करूनही अंगणवाडी सेविका व मदतनिसांना त्यांच्या कार्याचा मोबदला म्हणून फक्त तुटपुंजे मानधन दिले जाते. त्या अपुऱ्या मानधन प्राप्तीसाठी त्यांना 6 – 6 महिने वाट पाहावी लागते. आयसीडीएस प्रकल्पातील कळीचे काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनिसांना कायमस्वरूपी सेवेत न घेता स्वयंसेवी सेविकांप्रमाणे वागविण्यात येते. त्यांना कायम असुरक्षित ठेवण्यात आले आहे. त्यांना अत्यल्प मानधनावर कार्य करावे लागत असल्याने त्यांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. आयसीडीएस प्रकल्पात महत्वाचे काम करित असूनही त्यांना अत्यंत निम्न दर्जा देण्यात आला आहे. त्यांना मानधनाव्यतिरीक्त कोणत्याही कल्याणकारी सोयी सुविधा दिल्या जात नाही. उलट त्यांना पदरमोड करून, उसने उधार घेउन अंगणवाडीच्या दैनंदिन तसेच आकस्मीक बाबींसाठी खर्च करावा लागतो. तोही वर्ष – वर्ष मिळत नाही. त्यांनी केलेला प्रवास खर्चही वर्ष – दोन वर्ष थकित असतो.

**निष्कर्ष व उपाययोजनाः–**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र सरकारची समाजोपयोगी योजना आहे. या योजनेची अंमलबजावणीची जबाबदारी राज्य सरकारवर आहे. या योजनेचे तळागाळापर्यंत प्रत्यक्ष कार्य अंगणवाडी सेविका व मदतनीस या महिला कर्मचारी करतात. मात्र त्यांच्या कार्याचा मोबदला म्हणून देण्यात येणारे मानधन अत्यल्प असून त्याचा परिणाम त्यांच्या आर्थिक व सामाजीक समस्या वाढीवर होत आहे. त्या अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहेत. एक नियोक्ता म्हणून त्यांच्या समस्या सोडविणे ही सरकारची सामाजीक जबाबदारी आहे. मात्र सरकार त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत आहे. त्यांना महत्वाच्या कर्मचारी समजून त्यांना नियमीत मानधन वाढ देणे, वेळेवर मानधन देणे, त्यांच्यासाठी कल्याणकारी सोयी सुविधांची निर्मिती करणे, त्यांना बढतीची संधी देणे, अंगणवाडीत काम करण्या योग्य वातावरण निर्माण करणे आव यक आहे. आयसीडीएस प्रकल्पाचे यश हे अंगणवाडी सेविका व मदतनीसांप्रतिची सामाजीक जबाबदारी पूर्ण करण्यावरच अवलंबून आहे.

**संदर्भ सूचीः–**

1. 'महाराष्ट्रातील अनौपचारीक कामगारांसाठी असलेल्या सामाजिक सुरक्षा योजनांची मार्गदर्शक पुस्तिका' – 2017 आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, नवी दिल्ली
2. बालधोरण 2014 – महिला व बालविकास विभाग महाराष्ट्र भाासन
3. सुधीर बोधनकर, विवेक अलोणी, मृणाल कुळकर्णी, 2018 आठवी आवृत्ती, सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
4. त्रैमासिक – दवंडी, एप्रील – जून 2015 वर्ष सहावे, अंक चोविसावा, साथी प्रकाशन पुणे.
5. लोकजागर, अंक 6 वा, फेब्रु. 2014, जनार्थ आदिवासी विकास संस्था, नंदुरबार
6. आइसीडीएस मिशन – कार्यान्वयन के लिए विस्तृत ढांचा – 2012 – 13 महिला और बालविकास मंत्रालय भारत सरकार
7. सुपोषण कुंजी 'कुपोशण से जंग सुपोषण के संग' – 2015 – संचालनालय एकीकृत बाल विकास सेवा, महिला एवं बाल विकास विभाग, मध्यप्रदेश